# "कराड शहराचा दिपस्तंभ" नगराध्यक्ष स्व.पी.डी.पाटील

**वाघमारे अरूणा मधुकर**

इतिहास अधिविभाग, संशोधक विद्यार्थिनी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

***सारांश :***

जगण्यासाठी मनुष्याला केवळ एकच जन्म मिळतो हे निसर्गाचे चक्र आहे. एकाच जन्मात व्यक्तीच्या हातून जे कार्य घडते त्यामधून मृत्यूनंतरही एखाद्या व्यक्तीच्या अस्तित्वाच्या खुणा या त्याचे कार्य व लोकांच्या त्या प्रतीच्या सद्भावनाच जिवंत ठेवतात. आपल्या लोकोत्तर कार्याने कार्याने मृत्यूनंतरही कीर्तीचा सुगंध पसरविणाऱ्या अनेक लोकांची जननी असणाऱ्या या भारतभूमीच्या अनेक सुपुत्रांनी मृत्यूवरही विजय मिळवून आपल्या नावाचा डंका आसमंतात निनादत ठेवण्याची किमया करून दाखविली आहे. आपल्या अलौकिक कार्याने व त्या कार्यावरील लोकांच्या श्रद्धा, निष्ठा व सद्भावनेने स्वत:च्या नावाला अजरामरत्व प्राप्त करून घेतले आहे. कर्मयोग्यांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्राच्या मातीत आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवत अनेक ध्येयवेडयांनी स्वत:बरोबरच या भूमीलाही एक वेगळेपण व मोठेपण मिळवून दिले आहे. महाराष्ट्राच्या दक्षिण भागात मध्यभागी वसलेल्या सातारा जिल्हयातील कृष्णा व कोयनेच्या संगमावर वसलेले एक शहर म्हणजे 'कराड' स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांच्या पावन स्पर्शाने पुनित झालेल्या या शहराला प्राचीन कालखंडापासून एक ऐतिहासिक शहर म्हणून नावलौकिक लाभला आहे. तसेच अनेक कर्मयोगी लोकांचे वेगवेगळया क्षेत्रात योगदान लाभले आहे.

***प्रस्तावना:***

आपले कर्मच आपली एक वेगळी ओळख निर्माण करते या भावनेने समाजाभिमुख कार्यातून कराड शहराला एक आगळीवेगळी ओळख मिळवून देणाऱ्या स्व. पी.डी. पाटील साहेबांनी कराड शहरातूनच नेतृत्वाचे धडे गिरवून तब्बल ४२ वर्षे नगराध्यक्ष पदाचा सन्मान भूषविला. प्रभावी निर्णय क्षमता, दूरदृष्टी, समाजोपयोगी कार्यातून आपली आगळी वेगळी प्रतिमा निर्माण करणाऱ्या स्व.पी.डी.पाटील साहेबांना कराड शहराचा दिपस्तंभ म्हणल्यास त्यामध्ये अतिशयोक्ती ठरणार नाही.

❖ **कराड शहर :— भौगोलिक पार्श्वभूमी :—**

महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्हयातील कराड शहर हे तालुक्याचे ठिकाण आहे. कराड शहर 17'' 17' उत्तर अक्षांश आणि 74'' 13' पूर्व रेखांशावर असून हे शहर कृष्णा कोयनेच्या संगमावर पुणे – बंगळुर महामार्गावर वसलेले आहे. [१] पश्चिम समुद्रापासून अवघ्या ६२ मैलावर असलेले हे शहर 22०० फूट उंचीवर असल्याने या ठिकाणचे हवामान समशितोष्ण पद्धतीचे राहते. याशिवाय मान्सूनच्या टप्प्यात असल्याने निश्चित पाऊस काळात असणारा हा सधन भाग आहे. सहयगिरीच्या उंच व भक्कम तटाचे संरक्षण लाभलेल्या या शहराच्या वायव्येला ९ कि.मी अंतरावर वसंतगड, ईशान्येस ६ कि.मी वर सदाशिवगड आणि अग्नेयेस ६ कि.मी वर आगाशिवाचा डोंगर आहे.[२]

### ❖ पार्श्वभूमी :—

इ.स. १८१८ ला पेशवाईचा अस्त झाला प्रतापसिंह महाराजांना इंग्रजांनी गादीवर बसविले व नवीन सातारा राज्य अस्तित्वात आले. १८३९ छ. प्रतापसिंहाना इंग्रजांनी पदच्युत केले सातारा गादीचा शेवटचा वारसदार ठरलेल्या शहाजी उर्फ आप्पासाहेबांना औरस वारस नसल्याने डलहौसीने हे नवनिर्मित संस्थान १८४८ ला खालसा केले व सातारा हा मुंबई प्रांतात एक जिल्हा म्हणून अस्तित्वात आला.[३] नवीन इंग्रज अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी म्हणून सातारा जिल्हयाची सूत्रे हाती घेऊन त्याचे एकंदरीत ११ उपविभागात १८५६ ला विभाजन केले. या उपविभागातीलच एक उपविभाग म्हणून पुढे कराड हे तालुका म्हणून अस्तित्वात आले. ब्रिटीशांच्या विकेंद्रीकरणाच्या धोरणास अनुसरून मुंबई प्रांतात नगरपालिका अस्तित्वात येवू लागल्या त्यानुसार कराड शहरात १५ सप्टेंबर १८५५ मध्ये नगरपालिकेची स्थापना झाली या नगरपालिकेवर नागरिकांमधून नेमलेले पहिले नगराध्यक्ष म्हणून कै. रावबहादूर नारायण अनंत मुतालिक हे दि. (१/१०/१८८५ ते ३०/०९/१८८६) या कालावधीकरीता नियुक्त करण्यात आले.[४] कराड शहरासाठी नगराध्यक्षपदाची ही मालिका अखंडपणे अनेक लोकांनी आपल्या समर्थ खांद्यावर
पेलताना अनेक लोकांचे योगदान या पदासाठी महत्वपूर्ण ठरले. नगराध्यक्षपदाच्या मालिकेत अढळ स्थान मिळाविलेले पी.डी. पाटील यांच्या हाती सर्वप्रथम नगराध्यक्षपदाची सूत्रे दि. २० डिसेंबर १९५३ रोजी आली आणि जवळ जवळ ४५ वर्षे त्यांनी या पदावर आरूढ होऊन कराड शहराला आगळे वेगळेपण देण्याचा प्रयत्न अविरतपणे केला.[५] आपल्या नगराध्यक्षपदाच्या कारकिर्दीत त्यांनी विविध स्तूत्य उपक्रमातून एक शहर म्हणून कराडला दर्जेदार चेहरा मोहरा देण्याचा प्रयत्न केला. कराड नगरपालिकेचे नगराध्यक्षपद अनेक आव्हानांना तोंड देत पी.डी.पाटील यांनी आपल्या खांद्यावर समर्थपणे सांभाळत स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या कर्मयोगी वारश्याला निष्ठेने जपण्याचा प्रयत्न केला

### ❖ जीवन परिचय :—

श्री पांडुरंग दादासाहेब पाटील तथा पी.डी.पाटील यांचा जन्म कराड नगरीत एका गरीब शेतकरी कुटुंबात जुलै १९१८ रोजी झाला. बालवयात मातृछत्र हरविल्याने एकाकी पडलेल्या पांडुरंगाने पित्याचे बोट धरून जीवनप्रवास सुरू केला.[६] त्यांचे वडील दादासाहेब तथा दादाभाऊ पाटील हे कराडचे गावकामगार पाटील म्हणून काम पहात होते. प्रतिकूल परिस्थीतीवर मात करून जीवनाचा गड चढण्याची प्रेरणा तसेच नेतृत्वाचे बाळकडू त्यांना पित्याकडून मिळाले. टिळक हायस्कूल मधून शिक्षणासोबतच त्या काळच्या धार्मिक, सामाजीक आणि राजकीय विचार मंथनाचे चिरकालीन ठसे त्यांच्या मनावर उमटू लागले. सवंगडयांच्या सानिध्यातून त्यांना सहकाराचे सुवर्ण सापडले गेले व सहकार, सेवा आणि संघटन या त्रीसूत्रीवर विद्यालयीन जीवनातच नेतृत्वाचे नवांकुर निर्माण होवू लागले. प्रतिकूल परिस्थितीचे प्रहार सहन करीत त्यांनी मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. मॅट्रिक च्या यशाने त्यांची महाविद्यालयीन शिक्षणाची तळमळ अधिक प्रेरित झाली. तीव्र इच्छेला मार्ग सापडला आणि बडोद्याला शैक्षणिक सवलतींचा लाभ मिळाला त्यातूनच त्यांनी इंटर पर्यंतच्या शैक्षणिक प्रवासाची मजल मारली खडतर परिस्थितीने त्यांचा मार्ग अवघड केला होता पण मनाची उर्मी मात्र दुप्पट वेगाने धावत होती. नोकरीत रस नसल्याने त्यांनी वकीली व्यवसायात करिअर करण्याचा निर्धार केला आणि कोल्हापूरच्या साईक्स लॉ कॉलेजमधून सन १९४३ मध्ये एल.एल.बी. ची पदवी संपादन केली व वकीलीचा स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. कराड मधून १९४५ साली आपल्या वकीलीच्या व्यवसायाची मुहुर्तमेढ रोवणाऱ्या पी.डींना अल्पावधीतच तरूण आणि तडफदार वकीलाचे नावलौकीक प्राप्त झाले ते त्यांच्या वकीली व्यवसायातील आर्थिक लाभापेक्षा चिकित्सक वृत्तीतून कायद्यातील बारकावे अभ्यासणाऱ्या स्वभावामुळेच.

सेवा, सदभाव आणि सहिष्णुता यांच बालपणीच बाळकडू घेतलेल्या पी.डींना सत्तेपेक्षा सेवेचे आकर्षण अधिक भुरळ पाडत होते. १९५२ मध्येच कराड नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत ते नगरसेवक म्हणून निवडूण आले आणि आपल्या मनमिळावू स्वभावामुळे अवघ्या वर्षभरातच कराड नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती झाली. इतकेच नव्हे तर १९५३ पासून त्यांनी कराड नगरपालिकेचे नाव देशभरात पोहचविण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. दि. २० डिसेंबर १९५३ रोजी नगराध्यक्ष म्हणून निवडून आलेले पी.डी. या पदावर सलग २ वर्षे विराजमान झाले. दि. ३० जानेवारी १९५६ रोजी पुन्हा नगराध्यक्ष ते सलग २५ वर्ष म्हणजे ५ फेब्रुवारी १९८१ पर्यंत या पदावर विराजमान झाले.[७] १२ सन १९४७ ते १९७९ या पाच वर्षासाठी 'नगरसेवकाऐवजी' नगराध्यक्षाची सरळ मतदारतून निवडणूक असा एक प्रयोग शासनाने केला. त्यावेळी दिनांक १८ डिसेंबर १९७४ रोजी सर्व मतदारांनी पी.डी.पाटील यांना नगराध्यक्षपदी निवडून दिले. दि. ५ फेब्रुवारी १९८१ रोजी महाराष्ट्रातील सर्व नगरपालिका बरखास्त करून महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय राजवटी आणल्या १९८५ मध्ये पुन्हा नगरपालिकेची निवडणूक झाली व दि. १४ मे १९८५ रोजी पी.डींना पुन्हा नगराध्यक्षपदाची सुत्रे हाती मिळाली. २० डिसेंबर १९५३ ते १६ डिसेंबर १९९६

अखेर ४२ वर्षे नगराध्यक्षपद भूषविणाऱ्या गिनिजबुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये सन्माननीय स्थान मिळविलेल्या पी.डीं चे कर्तुत्व म्हणजे तब्बल ४२ वर्षे अखंडपणे नगरपालिकेचा अध्यक्ष असण्याची करामत करणारे या जगातील एकमेद्वीतीय उदाहरण आहे.

❖ **कराड नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून पार पाडलेली कामे :—**

मा. पी.डी. पाटील यांनी आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत कराड शहरात जे विधायक व कौतुकास्पद कार्य केले त्यामध्ये केवळ सुधारणा ही भूमिका न ठेवता त्यामागे कराड शहराला आधुनिकतेचे रूप देणे, पर्यटकांचा ओघ या शहराकडे वळविणे तसेच या भागातील लोकांच्या सोई सुविधांचाही विचार या कार्यामागे प्रामुख्याने केलेला दिसतो.

❖ **शहरातील रस्ते :—**

अरूंद, वेडयावाकडया व गल्लीबोळाच्या रस्त्यांचा कराड शहराच्या सुधारणांमध्ये प्रामुख्याने अडसर होता. ही अडचण ओळखून १९४८ साली शहराच्या रस्त्यांचा रूंदीकरणाचा व नवीन रस्त्यांच्या रूंदीकरणाचा आराखडा आखून या कार्यक्रमास आग्रक्रम देण्यात आला. १९५५ पासून सातत्याने या कार्यक्रमाचा पाठपुरावा करून नियोजनबद्ध मास्टर प्लॅनप्रमाणे शहरातील पहिला डांबरी रस्ता पटेल चौक मंगळवार वेस येथे १९५४ मध्ये पूर्ण करण्यात आला.८ कच्चे खडीचे तसेच मुरमाचे व डांबरीही पक्के रस्ते या काळात बांधले गेले.

❖ **स्मशानभूमी :—**

कराड शहरात पारंपारीक स्मशान हे वाळवंटात वीर मारूतीच्या मंदिराजवळ नदीच्या पात्रात होते. पावसाळयात नदयांना पूर येण्याने नागरीकांची फार गैरसोय होत आहे हे लक्षात घेऊन १९७२ मध्ये ८० हजार रू खर्च करून नवी स्मशानभूमी तयार केली व तेथे अंत्यविधीच्या सोयीसाठी दोन वेटींग शेडसही बांधण्यात आल्या.[९]

❖ **स्ट्रीट लाईट :—**

रस्ता रूंदीकरणात जागोजागी आलेले विजेचे खांब बाजूला घेऊन स्ट्रीट लाईट सरळ करण्यात आले १९६१ मध्ये बल्ब ऐवजी स्ट्रीट लाईट फिक्सर्स बसविणेस नगर पालिकेने सुरूवात केली व चौकाचौकात मर्क्युरी लॅम्पस बसूवन नागरिकांची सोय करण्यात आली.[१५]

❖ **कार्यालयीन इमारत :—**

कराडमधील नगरपालिकेस १९५५ पर्यंत स्वत:ची अशी कार्यालयीन इमारत नव्हती. सर्व खाती व उपविभागीय शाखांना कामात सूसूत्रता आणता यावी या उद्देशाने १९५७ साली नगरपालिकेने कार्यालयासाठी एक भव्य व प्रशस्त इमारतीचे काम पी.डींच्या नेतृत्वाखाली पूर्ण केले. अनेक सार्वजनिक संस्थांची ही वास्तू जननी आहे. उदा. सहयाद्री साखर कारखाना, प्रीतिसंगम सहकारी पाणी पुरवठा संस्था.[१०]

❖ **भाजीमार्केट :–**

१९६२ मध्ये शहराच्या नागरीकरणाला गती देत आसपासच्या खेडयातून येणाऱ्या शेतकरी वर्गास उपयुक्त होईल असे प्रशस्त भाजी मार्केट, १९६८ मध्ये फिश व मटण मार्केट व मार्केटच्या बाहेर २३ छोटे गाळे बांधून नागरिकांची सुविधा साधली गेली. [११]

❖ **शॉपिंग सेंटर्स :–**

नागरिक व व्यापाऱ्यांच्या सोईबरोबरच नगरपालिकेच्या उत्पन्नात ही भर पडण्यासाठी व नगर पालिकेच्या मालकीच्या इमारतीलगत शॉपींग सेंटर्स बांधल्याने सार्वजनिक इमारतींचेही संरक्षण व्हावे या हेतूने सुमारे आठ वेगवेगळया प्रकारचे गाळे असणाऱ्या अशा शहरामध्ये प्रमुख चार ठिकाणी शॉपिंग सेंटर्सची निर्मिती करण्यात आली.[१२]

❖ **भुयारी गटार योजना :–**

१९६५ साली ५५ लाख रू खर्चाची भुयारी गटार योजना हाती घेऊन ३३% शासकीय अनुदानावर ही योजना नगर पालिकेच्या ६७% खर्चाचा भार घेऊन १९७४ मध्ये पूर्ण करण्यात आली. गावाची स्वच्छता, आरोग्य यांच्या दृष्टीने उचललेले हे कार्य अत्यंत महत्वपूर्ण मानले जाते.[१३]

❖ **हौसींग सोसायटी :–**

नगरपालिकेतील तृतीय श्रेणीतील कामगारांच्या समस्येत लक्ष घालून १९६१–६२ मध्ये नगरपालिकेतील स्वच्छता कामगारांसाठी घराची योजना आखून १९६४–६५ पर्यंत यामध्ये ५३ कामगार कुटुंबाची सोय केली. मागासवर्गीयांना घरे बांधून देण्याच्या उद्देशाने 'नवयुग बॅकवर्ड क्लास हौसिंग सोसायटी' निर्माण करून १९८० ते १९९२ मध्ये ८५ कुटुंबांना स्वतंत्र घरे बांधून दिली.[१४]

❖ **सार्वजनिक वाचनालय :–**

लोकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी कऱ्हाडमध्ये 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' या नावाने सार्वजनिक वाचनालय १८५६ ला सुरू झाले आहे. हे वाचनालय लोक वर्गणीच्या माध्यमातून चालत होते. १९६३ मध्ये हे वाचनालय नगरपरिषदेच्या नवीन इमारतीत स्थलांतरीत झाले. आजही नाममात्र वर्गणीवर चालणारे हे वाचनालय खेंडयापाडयातील सर्वच मुलांसाठी अत्यंत उपुयक्त आहे. कराड शहरातीलच नव्हे तर आसपासच्या भागातून येणाऱ्या अनेक अभ्यासू विद्यार्थ्यांसाठी येथील ग्रंथसंपदा स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासाचा एक संजीवक मंच आहे. या वाचनालयास महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ठ ग्रंथालयाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार मिळला आहे.[१५]

❖ **व्याख्यानमाला :–**

१९३२ मध्ये कराडला नवरात्रामध्ये 'शारदीय व्याख्यानमाला' सुरू झाली. सुरूवातीला या व्याख्यानमालेचे संयोजन गावातील लोक करीत असत. १९६१ साली ही जबाबदारी पी.डी.नी स्वत:कडे नगरपरिषदेच्या माध्यमातून घेतली व यातूनच १९७२ मध्ये साने गुरूजी कथामाला, १२ मार्च १९७३ पासून यशवंतराव चव्हाण व्याखानमाला यांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या अंगच्या सुप्त गुणांना वाव देण्याचा प्रयत्न या व्याख्यान मालांच्या रूपाने केला केला जावू लागला.[१६]

❖ **स्मृतिसदने :–**

नगरपरिषदेच्या कामाचा व्याप वाढल्यावर वाचनालयाचे स्थलांतर नवीन इमारत बांधून 'टाऊन हॉल' या नावाने बांधलेल्या इमारतीत करण्यात आले. १९८४ ला स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या मृत्यूनंतर या वास्तूला 'यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन' असे नामाभिदान लाभले.[१७] या नवीन इमारतीमधील रंगमंदिर व वाचनालय बांधताना सर्व सुविधांची परिपूर्ती करण्याचा प्रयत्न केला गेला. कऱ्हाडमधील कलावंतांना नाटयप्रयोग करण्यासाठी यामध्ये प्राध्यान्य दिले. हौशी कलावंतांना प्रोत्साहन देत सुरू केलेली ही रंगमंदिराची योजना म्हणजे पी.डी.ंनी सांस्कृतिक चळवळीला पुढे नेण्यासाठी उचललेले महत्वपूर्ण पाऊलच वाटते. दुसरे अप्रतिम स्मृतिमंदिर म्हणजे सौ. वेणूताई चव्हाण यांच्या नावाने उभारले गेले. या दोन्ही वास्तू म्हणजे कऱ्हाडच्या सौंदर्यात तसेच सांस्कृतिक वारशात मोलाची भर टाकतात.

❖ **कर्तुत्ववान लोकांचे पुतळे :–**

कऱ्हाड या स्थळाचा सांस्कृतिक विकास साधण्यास तसेच प्रत्येक मोक्याच्या जागी सर्वांना प्रेरणा मिळण्यासाठी पी.डींनी नगरपरिषदेच्या वतीने संस्मरणीय कार्य करणाऱ्या नेत्यांचे पुतळे बसवून शहराच्या सौंदर्यात भर घातली व संस्कृती रक्षणाच्या कार्यात मोलाचे योगदान दिले. हे पुतळे उभारताना त्या पुतळयांमध्ये हुबेहुब त्या व्यक्तीची छबी उमटविताना स्वत: त्या व्यक्तिमत्वांचा अभ्यास करून शिल्पकारास सूचना केल्या.

❖ **स्व. यशवंतराव चव्हाण यांचे समाधी स्थळ :–**

यशवंतराव चव्हाण यांनी आपले बालपण कऱ्हाड शहरात गेले या शहराशी असलेल्या आपल्या भावनिक नात्याविषयीचे विचार स्वत: पी.डींना बोलून दाखविले होते. २५ नोव्हेंबर १९८४ ला यशवंतराव चव्हाण यांचा मृत्यू झाला त्यावेळी कृष्णा कोयनेच्या या प्रीतिसंगमावर त्यांना अंत्यसंस्कार देण्यात आले[१८] आपल्या या कर्मयोगी नेत्याची लोकांना सतत आठवण रहावी तसेच लोकांची या तिर्थक्षेत्री वर्दळ वाढेल कऱ्हाडचे सौंदर्य वाढेल या उद्देशाने येथे त्यांचे समाधीस्थळ उभे केले गेले ६ एकराच्या विस्तीर्ण परिसरात उभारलेले हे संगमपार्क लहान मुलांच्या खेळण्याबागडण्यासाठी सर्व खेळाच्या साहित्याने सजविलेले आहे. या समाधी परिसरामध्ये कऱ्हाडमध्ये होणारा कोणताही सांस्कृतिक कार्यक्रम साजरा केला जातो.

❖ **शिवाजी स्टेडियम :–**

कऱ्हाड हे विद्यानगरी म्हणूनही ओळखले जाते. या ठिकाणी येणाऱ्या अनेक गरीब, होतकरू मुलांना शिक्षणाबरोबरच बलसंवर्धनासाठी, खेळासाठी सर्व सोयी एकत्रीतच मिळण्याच्या उद्देशाने सुमारे ६ एकर जागेमध्ये हे स्टेडियम उभारले गेले आहे. दि. २९ एप्रिल १९७३ रोजी क्रिकेट महर्षी प्रा. दे.बु. देवधर यांच्या अध्यक्षतेखाली या स्टेडियमचे उद्घाटन कसोटीवीर श्री चंदू बोर्डे यांचे हस्ते करण्यात आले.[१९] विविध खेळांचे सामने या मैदानावर खेळले जातात. खेडयापाडयातील अनेक गुणवंत खेळाडूंना या शिवाजी स्टेडियमध्येने घडविले आहे व कऱ्हाड शहर व आसपासच्या परिसराला अनेक गुणवंत खेळाडू दिले आहेत. या स्टेडियमवर महाराष्ट्र विरूध्द मुंबई, राजस्थान विरूध्द महाराष्ट्र असे रणजी क्रिकेट सामनेही खेळले गेले आहेत.

❖ **शिवाजी शिक्षण संस्था :–**

आजच्या विज्ञान युगात लोकांना वैज्ञानिक ज्ञानाची दृष्टी जोपासता यावी या उद्देशाने सायन्स विषयाचे अध्यापन व्हावे या हेतूने यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज ची स्थापना करण्यात आली. १९५५ साली महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या चेअरमनपदी कार्यरत असलेल्या पी.डीं नी ही संस्था शिवाजी शिक्षण संस्था म्हणून सुरू केलेल्या संस्थेत विलिनीकरण करून घेऊन प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंतची सोय लोकांना दर्जेदार पद्धतीने उपलब्ध करून दिली. वेणूताई चव्हाण कॉलेज व यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज यांनी आपल्या शैक्षणिक दर्जाने जनमानसात प्रतिष्ठा प्राप्त केली आहे.[२०]

❖ **आदरणीय पी.डी. पाटीलसाहेब यांना मिळालेले पुरस्कार :—**

कराड नगरीची सर्वांगीण सुधारणा, सहकार, शिक्षण आणि समाजकारण अशा चौफेर कर्तुत्वातून साकार करणाऱ्या मा. पी.डी.पाटील यांच्या अतुलनीय कार्याला अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. १९९६ — 'प्रीतिसंगम पुरस्कार' — मुधआण्णा कुलकर्णी मेमोरियल ट्रस्ट, कराड १९९७ — ''भारत एक्सलन्स अॅवॉर्ड'' फ्रेंडशिप फोरम ऑफ इंडिया नवी दिल्ली. १९९९— 'माधवराव धुमाळ गुरूजी स्मृति पुरस्कार' सातारा क्रांती प्रतिष्ठान, सन २००० 'इंडिया गोल्ड स्टार अॅवॉर्ड — फ्रेंडशिप फोरम ऑफ इंडिया, नवी दिल्ली. २००१ 'राजर्षी शाहू महाराज पुरस्कार' क्रांती जनपरिवर्तन संस्था, २००२ — 'यशवंत जीवन गौरव पुरस्कार' त्रिशक्ती फौंडेशन, कराड २००३ — 'आबासाहेब वीर सामाजिक कृतज्ञता पुरस्कार.[२१]

❖ **निष्कर्ष :—**

१. कराड नगरीला नगराध्यक्षपदाच्या आपल्या ४२ वर्षाच्या प्रदीर्घ वाटचालीत अनेक सुधारात्मक योजना देवून एक आगळेवेगळे रूप देताना सुधारणांतून नेहमीच लोकांपयुक्तेचा उद्देश प्रत्येक कामाच्या मागे प्रधान हेतू ठेवला.
२. फक्त नागरिकांसाठीच नगरपालिका त्यांचे प्रश्न सोडविणारा खरा न्यायमंच असल्याचा विश्वास जनतेला दिला. १ एप्रिल १९६० पासून ५ फेब्रुवारी १९८१ पर्यंत सलग २१ वर्षे पद भूषविताना सर्व ठराव एकमताने घेतले गेले.
३. लोक संघटन, निर्णय क्षमतेची ओळख करून देत सलग ४२ वर्षे नगरपालिका अध्यक्षपद भूषवून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये स्थान मिळविले.
४. महाराष्ट्रात सहयाद्री पॅटर्न आणून सहकाराच्या क्षेत्रात वेगळे स्थान मिळविले.
५. कऱ्हाड शहराच्या आधुनिकीकरणात मोलाचा वाटा उचलला. एक नगराध्यक्ष म्हणून नगरपालिकेच्या वतीने अनेक पुरोगामी सुविधांचा नागरिकांना लाभ मिळवून दिला.
६. तब्बल ४२ वर्षे अखंडपणे नगर पालिकेचा अध्यक्ष असण्याची किमया करणारे या जगातील एकमेवाद्वितीय उदाहरण होय.

**संदर्भ**

१ पाटील पी.डी. संपादक, कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५, पृ. १.
२ महाराष्ट्र स्टेट गॅझेटीअर, सातारा, सुधारित आवृत्ती, १९९९ पृष्ठ ७४०
३ महाराष्ट्र स्टेट गॅझेटीअर, सातारा, इंग्रजी आवृत्ती पहिली १८८५, पृ. १
४ पाटील राजश्री शामराव, कराड नगरपालिकेचा इतिहास १८५५ — १९९३, आ.पी.डी.
५ पाटील गौर प्रतिष्ठान, कराड, सप्टेंबर २००५, पृष्ठ ३७, साप्ताहिक कराड वैभव — लेख १९९३, पृ. ३.
६ पाटील राजश्री, 'सेतू' — आ.पी.डी. पाटील स्मृतिग्रंथ' संपादक — रा.गो.प्रभुणे, प्रथम आवृत्ती १७ सप्टेंबर २००९, पृष्ठ २९
७ पाटील राजश्री, 'कराडनगर पालिकेचा इतिहास उपरोक्त' पृष्ठ १८५
८ कराड नगरपालिका रेकॉर्ड — ज.प्रो.बुक, १४ सप्टेंबर १९९३.
९ कराड नगरपालिका रेकॉर्ड — ज.प्रो.बुक १९६१
१० पाटील विठ्ठल लेख — रामप्रताप दिवाळी विशेषांक, १९९१.
११ नगरपालिका रेकॉर्ड — ज.प्रो.बुक १९६२
१२ कराड नगरपालिका रेकॉर्ड — मिटींग वृत्तांत, १४ सप्टेंबर, १९९३
१३ पाटील विठ्ठल लेख — रामप्रताप दिवाळी विशेषांक, १९९१.
१४ साप्ताहिक कराड वैभव, १९९३, पृ. १६
१५ प्रभुणे रा.गो., 'सेतू' आ.पी.डी. पाटील स्मृतिग्रंथ, प्रथमआवृत्ती १७ सप्टेंबर २००९ पृ. ९९
१६ भोसले विकास 'सहयाद्रीचा पाठीराखा' नोव्हेंबर २०१२, पृ. १०१

१७ कित्ता पृ. १०५
१८ कराड नगरपालिका रेकॉर्ड – मिटींग वृत्तांत, १४ सप्टेंबर, १९९३.
१९ कराड नगरपालिका रेकॉर्ड – ज.प्रो.बुक, १९७३ – ७४,
२० शिवाजी शिक्षण संस्था, रौप्य महोत्सव स्मृतीग्रंथ, मुद्रक – पी.डी.पाटील विंगकर १९७१,पृ. ११९
२१ कराड तालुक्याचे भाग्यविधाते – आ.पी.डी.पाटील साहेब, प्रेरणा पब्लिकेशन्स विद्यानगर, पृ. ५